पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०३२ दि. २०/०९/२०१९**

**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**तक्रारदार यांचे ऑनलाईन ट्रान्सपर झालेले पैसे परत मिळवुन दिले बाबत.**

चंदननगर पो. स्टे. चे हद्दीमध्ये राहाणारे श्री. संदिप शर्मा, रा. खराडी, चंदननगर, पुणे यांनी दिनांक १२/०९/२०१९ रोजी ऑनलाईन शॉपींग करीत असतांना त्यांना अज्ञात इसमाने त्यांचे एचडीएफसी बँक, कोलकत्ता शाखा या बँकेचे डिटेल्स विचारुन त्याव्दारे त्यांचे रु. १,०००/- व रु. ३१९९८/- रुपये मोबी क्वीक या मर्चंटवर ऑनलाईन ट्रान्सपर करुन घेतले होते. त्याबाबत सदर अर्जदार यांनी चंदननगर पोलीस स्टेशन येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक - शंकर खटके यांचेकडे दिनांक १६/०९/२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला होता. वपोनि. शंकर खटके यांनी तात्काळ पोउपनि. किरण वराळ व पोशि. ८५६४, किरण पालांडे या सायबर पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांना सुचना देवुन कार्यवाही करणेसाठी आदेश दिले होते. त्याप्रमाणे पोउपनि. किरण वराळ व पोशि. ८५६४, किरण पालांडे यांनी मोबी क्वीक या मर्चंटशी पत्रव्यवहार करुन अर्जदार यांचे एकुण रु. ३२,९९८/- परत मिळवुन दिले आहेत. अर्जदार श्री. संदिप शर्मा यांना त्यांचे पैसे परत मिळाल्याने त्यांना खुप आनंद होवुन, त्यांनी पोलीसांचे आभार मानुन, कौतुक केले आहे.

सदरची चांगली कामगिरी वपोनि. शंकर खटके यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. किरण वराळ व पोशि. ८५६४, किरण पालांडे यांनी केली आहे.